नि.फौ.ख.क्र. १६/२०२२
सरकार वि. धिरज
नि.क्र. २७

सरकारतर्फे साक्षदार क्रमांक २ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
नाव – संदीप रामाजी भुजबळ,
वय – ४० वर्ष, व्यवसाय – शेती,
राहणार – भुगाव, तह. कामठी, जिल्हा – नागपुर.

सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री.बी.एम.भगत द्वारा

१. आरोपी आणि फिर्यादी माझ्या घराशेजारी राहत असल्यामुळे मी त्या सर्वांना ओळखतो. दिनांक २३.१०.२०२१ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकामी फिर्यादी देविदासच्या घरी बोलविले होते. आरोपी धिरजने देविदासला वरुन विटा फेकुन मारण्याची घटना तेथे घडली होती. त्यावेळेस माझ्यासोबत शिवकुमार सावरकर म्हणुन दुसरा पंच होता. घटनास्थळ देविदासने पोलीसांना दाखविला होता. मी घटनास्थळी गेल्यावर पाहीले की देविदासच्या घरासमोर विटा पडुन होत्या. पोलीसांनी सदर ठिकाणाचा पंचनामा केला तसेच सदरच्या विटा पंचनाम्याद्वारे जप्त केल्या. आता मला सदरचा घटनास्थळसह जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी क्रमांक पी २८** देण्यात येते. आता मला पोलीसांनी मोक्यावर हजर राहण्यासाठी दिलेली नोटीस दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी क्रमांक पी २९** देण्यात येते. ज्या विटा पोलीसांनी फिर्यादीच्या घरासमोरुन जप्त केल्या होत्या त्या मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला आर्टिकल अ वरील दोन विटांचे तुकडे दाखविण्यात आले. सदरचेच तुकडे पोलीसांनी फिर्यादीच्या घरासमोरुन जप्त केले होते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीचे वकिल श्री. एस.एस. राव यांच्यातर्फे –**

**२.** फिर्यादी देविदासला मी लहानपणापासुन ओळखतो. माझे घर त्यांच्या घरापासुन दोन घर आड आहे. नि.क्र.२८ व २९ वरील सहया पोलीसांनी मी घटनास्थळावर हजर असतांनाच घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की सदर दस्तांवरील मजकुर पोलीसांनी लिहुन आणला होता व माझी सही घेतली होती. साक्षदार स्वतःहुन सांगतो की सदर मजकुर माझ्यासमक्षच लिहीला होता. हे म्हणणे खरे नाही की सदरच्या सहया मी पोलीस स्टेशनमध्ये केल्या होत्या. मला नि.क्र.२८ वरील पंचनाम्यातील प्रत्येक पानाचा मजकुर माहीत आहे. मला वाचता येत नसल्यामुळे कोणत्या पानावर घटनास्थळाची चतुःसिमा दर्शविली आहे हे सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की मला लिहीता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की मी आज देविदाससोबत न्यायालयात आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की आज न्यायालयात काय साक्ष द्यायची आहे ते मला देविदासने शिकविले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी देविदासच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत. समक्ष

मौदा.

दिनांक १६.०१.२०२४ (ए.बी. कादियन )

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा